नाशिक महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमांत सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांक: नामपा-२०२२/प्र.क्र.१८९/नवि-२५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ डिसेंबर, २०२२.

वाचा :- १) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, क्र.नामपा-२०१७/प्र.क्र.२३३(भाग-१)/नवि-२५, दि.२८ सप्टेंबर, २०२२.
२) आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचे पत्र क्र.आस्था/वशि/कार्या-४/१५७९/२०२२, दि.१४.११.२०२२.

**प्रस्तावना :-** नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील विविध संवर्गातील ६३ पदांचे व अग्निशमन विभागातील १० पदांचे सेवा प्रवेश नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५७ (३) नुसार मान्यता देण्यात आली असून, सदर सेवा प्रवेश नियम अंतिमरित्या दिनांक २८.०९.२०२२ अन्वये, शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर सेवा प्रवेश नियमातील "विभागीय स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता मुकादम" या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी दि.१४.११.२०२२ अन्वये प्रस्तावित केले आहे.

त्याचप्रमाणे, दि.२८.०९.२०२२ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य व अग्निशमन विभागाच्या सेवा प्रवेश नियमांतील अग्निशमन विभागातील पदांमधील अ.क्र.८ येथील फायरमन (अग्निशामक) या पदासमोरील नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती यामध्ये सदर पदास जोखीम भत्ता रु.५००/- याऐवजी रु.५०००/- असे टंकलेखन चुकीमुळे दर्शविण्यात आलेले आहे. सदर फायरमन (अग्निशामक) या पदास जोखीम भत्ता रु.५००/- अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब, वरीलप्रमाणे सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी प्रस्तावित केल्यानुसार, दि.२८.०९.२०२२ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य व अग्निशमन विभागाच्या सेवा प्रवेश नियमांतील "विभागीय स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता मुकादम" या पदांच्या सेवा प्रवेश नियमांत खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार सुधारणा करण्यास तसेच, उक्त सेवा प्रवेश नियमांतील फायरमन (अग्निशामक) या पदास जोखीम भत्ता रु.५००/- अशी सुधारणा करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५७ (३) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | पदनाम आणि सेवा व वर्ग | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ०३ | विभागीय स्वच्छता निरीक्षक (श्रेणी-३ आरोग्य सेवा) | नामनिर्देशन २५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि स्वच्छता निरिक्षक पदविका.<br>ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील आरोग्य निरीक्षक/ स्वच्छता निरीक्षक या संवर्गातील किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>क) शास्त्र शाखेची पदवी आणि अथवा एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य. |
| | | पदोन्नती ७५% | नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता निरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| ०४ | स्वच्छता निरीक्षक (श्रेणी-३ आरोग्य सेवा) | नामनिर्देशन ५०% | अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एचएससी) उत्तीर्ण आणि शासन मान्यता प्राप्त संस्थेची स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण.<br>ब) संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>क) शास्त्र शाखेची पदवी आणि अथवा एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य. |
| | | पदोन्नती ५०% | नामनिर्देशनाने विहित केलेली (अ) येथील शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता मुकादम / सफाई कामगार या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांमधून जेष्ठता व गुणवत्ता या आधारे. |
| ०५ | स्वच्छता मुकादम (श्रेणी-४ आरोग्य सेवा) | पदोन्नती १००% | महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगार पदाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(शं.त्र्यं.जाधव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रती,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
४. निवड नस्ती (नवि-२५)

Scanned with OKEN Scanner